# <u>प्रेसनोट दि.१२/०३/२०१९</u>

## <u>मुंढवा पोलीस स्टेशन,पुणे शहर</u>

## <u>सराईत गुन्हेगारास गावठी कटटा व जिवंत काडतुसासह केले जेरबंद</u>

दि.११/०३/२०१९ रोजी मुंढवा पोलीस ठाणेकडील नेमुणकीस असणारे पोलीस नाईक जगताप यांना बातमीदारा मार्फत माहीती मिळाली की अंबरनाथ पोलीस स्टेशन कडील पाहीजे आरोपी नामे इरफान शेख हा महादेव मंदीर मुंढवागांव पुणे येथील वट्यावर बसलेला आहे सदर बातमीचे अनुषंगाने तपास पथकाचे पोलीस उप-निरीक्षक गवळी व पो.ना जगताप यांनी श्री.संपत भोसले मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक मुंढवा पोलीस ठाणे यांना माहिती दिली असता त्यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी तपास पथकातील पोलीस उप-निरीक्षक व कर्मचारी यांना योग्य ते मार्गदर्शन करुन रवाना केले असता नमुद पोलीस उप-निरीक्षक गवळी व तपास पथकातील सहा पोलीस फौजदार सोनवणे, पोलीस हवालदार २०३९ चव्हाण पोलीस नाईक ३६६३ गायकवाड, पो.ना २५३२ जगताप, पो.ना ६५४५ चव्हाण पो.ना. ८१८१ शिंदे पो.शि. ७७०० कांबळे, पो.शि. ७६९५ जाधव, पो.शि ८१२५ भापकर, पो.शि ८२२६ देशमुख यांनी नमुद बातमीचे अनुषंगाने सदर ठिकाणी जावुन दोन टिम तयार करुन शिताफीने सदर आरोपी इरफान गुलाब शेख वय २७ वर्ष रा. साईबाबा मंदीराचे पाठीमागे, शास्त्रीनगर, अंबरनाथ ठाणे(पश्चिम) यांस ताब्यात घेवुन त्यांची अंगझडती घेतली असता त्यांचे अंगझडतीमध्ये २५,४००/- रु किंमतीचे एक गावठी बनावटीचे लोखडी धातुचे पिस्टल व दोन जिवंत काडतुसे मिळुन आल्याने त्यांचेविरुध्द मुंढवा पोलीस ठाणे येथे पो.ना निलेश जगताप यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन भारतीय हत्यार कायदा कलम ३(२५) व महाराष्ट्र.पो.का. १९५१ चे कलम ३७ (१)(३)सह १३५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन नमुद आरोपी यांस अटक करण्यात आलेले आहे. नमुद गुन्हयाचा पुढील तपास अमोल गवळी, पोलीस उप निरीक्षक, तपास पथक हे करीत आहेत.

**तसेच नमुद आरोपी यांचेबाबत अधिक माहिती घेता नमुद आरोपी यांचेविरुध्द अंबरनाथ पोलीस ठाणे येथे घरफोडी, दंगल, गंभीर दुखापत, दरोडा, चोरी या सदराखालील एकुण १८ गुन्हे दाखल असुन त्यांचेवर यापुर्वी हददपार व एम.पी.डी.ए अंतर्गत कारवाई करण्यात आलेली असुन तो सध्या अंबरनाथ पोलीस ठाणे येथे दरोडा व दुखापतीचे ०२ गुन्हयामध्ये पाहिजे असल्याचे निष्पन्न झालेले आहे.**

सदर गुन्हयाचा मा.श्री. ए.बी. फुलारी, अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, पुणे, मा.श्री. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ५, पुणे, मा.श्री. सुनिल देशमुख, सहा. पोलीस आयुक्त, हडपसर विभाग, पुणे शहर, संपत भोसले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मुंढवा पोलीस ठाणे, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप-निरीक्षक अमोल गवळी हे तपास करीत असुन सहा पोलीस फौजदार सोनवणे, पोलीस हवालदार २०३९ चव्हाण पोलीस नाईक ३६६३ गायकवाड, पो.ना २५३२ जगताप, पो.ना ६५४५ चव्हाण पो.ना. ८१८१ शिंदे पो.शि. ७७०० कांबळे, पो.शि. ७६९५ जाधव, पो.शि ८१२५ भापकर, पो.शि ८२२६ देशमुख यांनी उपरोक्त कामगिरी केली आहे.

तरी नमूद पोलीस अधिकारी व कर्मचा-यांच्या चांगल्या कामगिरीबद्दल दैनिक वर्तमानत्रामध्ये प्रसिध्दी देण्यास विनंती आहे.

**(संपत डी. भोसले)**
**वरिष्ठ पोलीस निरीक्षक,**
**मुंढवा पोलीस स्टेशन पुणे शहर**